सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : १९५ | मंगळवार, दि. ७ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





**श्री. उमेश सोनार**
शहर कार्याध्यक्ष : राष्ट्रवादी युवक काँग्रेस



**श्री. बंटी पाटील**
अमळनेर



**श्री. प्रकाश पवार**
अमळनेर



**सौ. सुप्रिया पाटील - देवरे**
अमळनेर



**श्री. वेदांशू पाटील**
अमळनेर

# छत्रपती शिवाजी महाराज आणि भगतसिंग पुन्हा जन्माला आले पाहिजेत. मात्र, शेजारच्या घरात...!

## ही प्रवृत्ती थांबली आणि प्रत्येक जण निर्भय झाला तर दर्जेदार विकासकामे होणे आणि यंत्रणा सुरळीत राहणे काहीच विशेष नाही...!!

## बाकी कुणाशीही कोणत्याही टोकाचा संघर्ष करण्यासाठी दै. 'ग्लोबल महातेज'सोबत आहेच...!!!

**दै. 'ग्लोबल महातेज' ज्वलंत समस्यांच्या संदर्भात अत्यंत स्फोटक व वस्तुनिष्ठ पद्धतीने बातम्या देऊन जनसामान्यांच्या समस्यांना वाचा फोडण्याचा अत्यंत प्रामाणिकपणे व निर्भयतेने प्रयत्न करीत आहे. त्याचे सुपरिणाम दृश्य स्वरूपात दिसतही आहेत. त्यामुळे अनेकजण मोठ्या अपेक्षेने दै. 'ग्लोबल महातेज'कडे तोंडी व लेखी स्वरूपात तक्रारी करीत आहेत. मात्र, त्यात अनेकांची भूमिका अशी असते की आम्ही तक्रारी करू; पण पुढचे सर्व सोपस्कार दै. 'ग्लोबल महातेज'नेच निस्तरावेत. हे योग्य नाही. दर्जेदार कामे व्हावीत, ही सर्वांचीच सामूहिक जबाबदारी आहे. ही जबाबदारी कशी पार पाडावी यासंदर्भात आदर्श आचारसंहिता आहे. त्याबाबत आज लोकहितार्थ आम्ही माहिती प्रसिद्ध करीत आहोत. त्या माहितीच्या अधिकाराने प्रत्येक नागरिकाने सक्षमतेने व निर्भयतेने पुढे आले पाहिजे. कंत्राटदारांच्या अति नफेखोरी तथा आसुरी प्रवृत्तीने करोडो रुपयांच्या विकासकामांची अक्षरशः वाट लागते आहे. अत्यंत भ्रष्ट असलेली यंत्रणा या सर्वांची बिले बिनबोभाट अदा करते आहे. सच्च्या तक्रारदारांच्या समर्थनार्थ दै. 'ग्लोबल महातेज' सोबत आहेच. आमच्याकडे तक्रार करताना तक्रारदारांमध्ये हिंमत असेल, तक्रार सत्य असेल आणि तक्रारदार शेवटपर्यंत शब्दाला टिकणार असेल तरच त्याने करावी. आम्ही कोणत्याही संकटाला किंवा कोणत्याही महाशक्तीला न घाबरता तकार तडीस नेऊ, हा आमचा शब्द आहे. 'भीती' हा शब्द दै. 'ग्लोबल महातेज'च्या डिक्शनरीत नाही.**

**सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी) व नगरपालिकेच्या कामांमध्ये निकृष्ट दर्जा हा केवळ आर्थिक नुकसान नाही, तर नागरिकांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण करतो. यावर बहुआयामी पद्धतीने उपाय करणे आवश्यक आहे.**

### १) समस्या का निर्माण होते?

ठेकेदारांकडून खर्च वाचविण्यासाठी निकृष्ट साहित्य वापर
अभियंत्यांकडून योग्य देखरेख न होणे
**भ्रष्टाचार व संगनमत**
काम पूर्ण झाल्यावर गुणवत्ता तपासणीचा अभाव
नागरिकांचा कमी सहभाग/जागरूकता

### २) नागरिकांनी काय भूमिका घ्यावी?

(A) **सतर्क नागरिक बनणे**
- काम सुरू असताना रोज निरीक्षण करा
- साहित्य (सिमेंट, वाळू, खडी) योग्य आहे का ते पाहा
- पाणी मारले जाते का (Curing) ते तपासा

(B) **तक्रार नोंदविणे**
- संबंधित नगरपालिका/पीडब्ल्यूडी कार्यालयात लेखी तक्रार करा
- ऑनलाईन पोर्टल (उदा.- CPGRAMS) वर तक्रार नोंदवा
- RTI (माहितीचा अधिकार) अंतर्गत माहिती मागवा

(C) **सामूहिक दबाव निर्माण करणे**
- स्थानिक नागरिक संघटना तयार करा
- पत्रकार, सोशल मीडिया यांचा वापर करा
- लोकप्रतिनिधींना (नगरसेवक, आमदार) प्रश्न विचारा

### ३) काम योग्य व्हावे, यासाठी कोणती दक्षता?

- **काम सुरू होण्यापूर्वी :**
  कामाचे अंदाजपत्रक (Estimate) वाचून घ्या
  डिझाईन व मटेरिअल स्पेसिफिकेशन तपासा
- **काम चालू असताना :**
  * सिमेंटचे योग्य प्रमाण (Mix Ratio) पाळले जाते का?
  * लोखंडी सळया (Reinforcement) वापरल्या जात आहेत का?
  * Curing (पाणी मारणे) ७१४ दिवस होत आहे का?
- **काम पूर्ण झाल्यावर :**
  * गुणवत्ता तपासणी (Quality Test) मागवा
  * रस्ता लगेच खराब होत असेल तर तक्रार करा

### ४) अभियंत्यांची जबाबदारी काय?

**पीडब्ल्यूडी/नगरपालिकेचे अभियंते यांची मुख्य जबाबदारी :**
- कामाचे तांत्रिक मानक (Technical Standards) पाळले जात आहेत का ते पाहणे
- साइटवर नियमित तपासणी करणे
- निकृष्ट काम त्वरित थांबविणे
- मोजमाप पुस्तिका (Measurement Book) योग्य ठेवणे
- अंतिम बिल देण्यापूर्वी गुणवत्ता तपासणी करणे
  जर त्यांनी हे केले नाही, तर ते कर्तव्यच्युती (Dereliction of duty) ठरते.

### ५) दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई होऊ शकते?

- प्रशासकीय कारवाई :
- निलंबन (Suspension)
- चौकशी (Departmental Inquiry)
- बदली (Transfer)
- कायदेशीर कारवाई :
- भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा Prevention of Corruption Act 1988 अंतर्गत केस
- पोलीस/ACB (Anti-Corruption Bureau) कडे तक्रार

### ६) दीर्घकालीन उपाययोजना

- पारदर्शकता वाढविणे
- सर्व कामांची माहिती सार्वजनिक फलकावर लावणे
- ऑनलाईन ट्रॅकिंग सिस्टीम
- तृतीय पक्ष तपासणी (Third Party Audit)
- स्वतंत्र एजन्सीकडून गुणवत्ता तपासणी
- तंत्रज्ञानाचा वापर
- CCTV / ड्रोन मॉनिटरिंग
- GPS आधारित मटेरिअल ट्रॅकिंग
- कठोर नियम
- ठेकेदारांना ब्लॅकलिस्ट करणे
- दोषी अधिकाऱ्यांवर कडक दंड

### ७) 'जनतेचा पैसा वाया जाऊ नये' यासाठी काय करावे?

- 'जनता निरीक्षक' (Citizen Vigilance) ही संकल्पना मजबूत करा
- प्रत्येक कामात Social Audit लागू करा
- 'काम पूर्ण = जबाबदारी संपली' अशी मानसिकता बदलावी
- कामाची हमी (Defect Liability Period) काटेकोरपणे लागू करावी

### निष्कर्ष

निकृष्ट कामे थांबविण्यासाठी फक्त सरकार नाही, तर नागरिक + प्रशासन + कायदा हे तिन्ही घटक सक्रिय असणे गरजेचे आहे.
जर नागरिक जागरूक राहिले आणि सातत्याने प्रश्न विचारले, तरच 'घामाच्या पैशाचे चीज' होईल.

## खाली तुमच्यासाठी तक्रार अर्ज आणि RTI अर्ज यांचे सोपे, वापरायला तयार नमुने दिले आहेत.

### निकृष्ट कामाबाबत तक्रार अर्ज (नगरपालिका / पीडब्ल्यूडीसाठी)

**प्रति,**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग / मुख्याधिकारी, नगरपालिका**
**(ठिकाणाचे नाव)**

**विषय : निकृष्ट दर्जाच्या रस्ता/बांधकाम कामाबाबत तक्रार**

महोदय,
मी खाली सही करणारा/करणारी आपल्या विभागाच्या अखत्यारीतील ____________
**(ठिकाणाचे नाव)** येथे सुरू असलेल्या/पूर्ण झालेल्या ____________
**(कामाचे स्वरूप रस्ता/गटर/इमारत)** या कामाबाबत तक्रार करीत आहे.

**सदर कामामध्ये खालील गंभीर त्रुटी आढळून येत आहेत :**
- निकृष्ट दर्जाचे सिमेंट/साहित्य वापरले जात आहे
- सिमेंट, वाळू व खडीचे प्रमाण चुकीचे आहे
- लोखंडी सळयांचा वापर केला जात नाही
- बांधकामानंतर पाणी (Curing) मारले जात नाही
- काम अल्पावधीतच खराब होत आहे

वरील बाबींमुळे कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून सार्वजनिक पैशांचा अपव्यय होत आहे. तरी आपणास विनंती आहे, की सदर कामाची तत्काळ तांत्रिक तपासणी करण्यात यावी दोषी ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी निकृष्ट काम पुन्हा योग्य दर्जात करून घ्यावे. आपली त्वरित कार्यवाही अपेक्षित आहे.
धन्यवाद!

आपला विश्वासू,
नाव : ____________
पत्ता : ____________
मोबाईल : ____________
दिनांक : ____________
स्वाक्षरी : ____________

### माहिती अधिकार (RTI) अर्ज नमुना

**प्रति,**
**सार्वजनिक माहिती अधिकारी (PIO),**
**सार्वजनिक बांधकाम विभाग / नगरपालिका**
**(ठिकाणाचे नाव)**

**विषय : माहिती अधिकार कायदा २००५ अंतर्गत माहिती मागणी अर्ज**

महोदय,
मी माहिती अधिकार कायदा २००५ अंतर्गत खालील माहिती मागवत आहे.
- कामाचे नाव व ठिकाण
- या कामाचे मंजूर अंदाजपत्रक (Estimate)
- सदर कामासाठी मंजूर रक्कम व खर्च तपशील
- कामाचा ठेकेदार कोण आहे व त्याची निविदा प्रत
- कामाचे तांत्रिक तपशील (Specification)
- कामाचे निरीक्षण करणाऱ्या अभियंत्यांची नावे
- कामाची पूर्णता तारीख व हमी कालावधी (Defect Liability Period)
- गुणवत्ता तपासणी अहवाल (Quality Test Report)
- मी आवश्यक अर्ज फी भरत आहे.

कृपया कायद्यानुसार ३० दिवसांत माहिती उपलब्ध करून द्यावी.

धन्यवाद!
आपला विश्वासू,

नाव : ____________
पत्ता : ____________
मोबाईल : ____________
दिनांक : ____________
स्वाक्षरी : ____________

**उपयोगी टिप्स : अर्ज देताना स्वत:कडे एक कॉपी ठेवा (Received Stamp घ्या) शक्य असल्यास फोटो/व्हिडिओ पुरावे जोडा RTI साठी साधारण ₹१० फी लागतेउत्तर न मिळाल्यास अपील करता येते.**

## दिनविशेष

०७ एप्रिल

- आर्य समाजाची स्थापना झाली.
- जागतिक आरोग्य संघटना (WHO) स्थापना झाली.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

**आरोग्य हेच खरे धन!**

पान ३ वर

## संपादकीय

# नेहमीच येती अवकाळीच्या कळा



युद्धाच्या झळा वेगवेगळ्या पद्धतीने छळत असताना त्यात अवकाळीने भर घालून आणखीनच दाणादाण उडवलेली आहे. राज्यातील सगळ्या परिसरात या उन्हाळी अवकाळी पावसाने ज्या पद्धतीने थैमान घातले आहे ते पाहिल्यानंतर 'नेमेचि येतो पावसाळा' या म्हणीमध्ये थोडा बदल करून 'नेहमीच येती अवकाळीच्या कळा' असे त्याचे वर्णन करण्याची वेळ आलेली आहे. अवकाळी पावसामुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. प्रत्यक्ष पावसाळ्यात होणाऱ्या नुकसानीपेक्षा या अवकाळीचा तडाखा जबरदस्त मानला पाहिजे. कारण या काळात रब्बी पिकांचा हंगाम असतो आणि यावेळी गहू, मका, द्राक्ष, फळफळावळ, केळी, संत्रा, डाळिंब यासारख्या उत्पादनांना मोठा वाव असतो. कोकणासारख्या भागात तर आंब्याला मोठी मागणी असते. परंतु हा अवकाळी अशा काही काळात येतो की ज्या वेळात आता ही सगळी पिके काढून विकण्याची वेळ आलेली असते. त्या काळात पिकांची योग्य ती काळजी घेऊन ती पिके विक्रीसाठी नेण्याच्या ऐन हंगामात अवकाळीच्या तडाख्याला सामोरे जावे लागते आणि त्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. अवकाळी पाऊस हा आता काही नवीन राहिलेला नाही. तो दरवर्षीचा प्रकार झालेला आहे. एवढेच नव्हे तर तो केव्हा आणि कसा येईल याचा कुठलाही भरवसा राहिलेला नाही. परंतु वेधशाळांच्या तत्परतेमुळे निदान दोन-चार दिवस आधी अवकाळी येणार असल्याच्या सूचना मिळतात. तो कुठे-कुठे येईल आणि काय-काय प्रमाणामध्ये येईल याचा सुद्धा साधारणपणे अंदाज व्यक्त केला जातो. पण ही सगळी माहिती मिळाल्यानंतर शेतकरीही सावध होत नाहीत आणि सरकारसुद्धा ढिम्मपणाने बसून राहते. खरेतर एखादे चक्रीवादळ जेव्हा येते त्यावेळेला सरकारकडून एनडीआरएफच्या टीम तैनात केल्या जातात. लष्करालाही सावध ठेवले जाते. कारण कुठल्या प्रसंगात हे चक्रीवादळ कशा पद्धतीने नुकसान करेल याचा भरवसा नसतो. विशेषत: जीवित आणि वित्तहानी होऊ नये ती कमीत कमी प्रमाणात व्हावी याकरिता चक्रीवादळाच्या काळामध्ये जशी सावधानता बाळगली जाते अगदी पावसाळ्याच्या काळात सुद्धा अशा प्रकारची वादळे येऊन मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता असते.

हे नुकसान टाळण्याकरिता एनडीआरएफच्या टीम सतत सावध ठेवल्या जातात. त्याच पद्धतीने वेधशाळांकडून अंदाज व्यक्त झाल्यानंतर एनडीआरएफच्या टीमप्रमाणेच शेती आणि शेतकऱ्यांसाठीसुद्धा अशा प्रकारचे सहाय्य करणारे पथक निर्माण करण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांना तातडीने सावध करून आवश्यक ती मदत पोहोचविता आली पाहिजे आणि आपली पिके कशी वाचवता येतील याच्याबद्दलचे मार्गदर्शन किंवा साधनसामुग्री उपलब्ध करून दिली पाहिजे. आज तंत्रज्ञान इतके विकसित झालेले आहे की काही क्षणांमध्ये पिकांना अवकाळीपासून वाचवण्याची व्यवस्था करता येऊ शकते. विदर्भामध्ये तर या अवकाळीने इतका जबरदस्त तडाखा दिला की अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात गारपीट झाली आणि मार्केट यार्डमध्ये उघड्यावर ठेवलेली धान्याची पोती या पावसामुळे खराब झाली. खरेतर अवकाळी पाऊस येणार म्हटल्यानंतर ही पोती तातडीने उचलण्याचे काम सुद्धा संबंधित मार्केट यार्डने किंवा शेतकऱ्यांनी करायला हवे होते. परंतु ते सुद्धा केले गेले नाही. अवकाळी पावसाचा इशारा मिळूनही जर योग्य ती उपाययोजना केली जात नसेल तर त्या पावसाला दोष देऊन उपयोगाचे नाही. यंत्रणा सक्षम नाहीत आणि तातडीने उपाययोजना करण्याची तत्परता दाखविली जात नाही. त्यामुळे अवकाळीचे नुकसान सातत्याने वाढत आहे. सरकारला याबाबतची जाणीव व्हायला पाहिजे. कारण ज्या काळामध्ये शेतकऱ्यांना उत्पन्न मिळण्याची शाश्वती असते त्या काळात या सगळ्या प्रयत्नांवर पाणी फिरविण्याचे काम अवकाळी पाऊस करतो आणि अवकाळीचा हा प्रकार म्हणजे केवळ निसर्गाचा प्रकोप नसून सरकारच्या अकार्यक्षम व्यवस्थेचा प्रकोप म्हणावा लागेल. जर योग्य त्या व्यवस्था तातडीने करता आल्या त्या-त्या जिल्हाधिकाऱ्याने आपापल्या भागात या अवकाळीपासून पिकांचे आणि अन्य गोष्टींचेही संरक्षण करण्याच्या नीट सूचना देऊन मार्गदर्शन केले तर या संकटामुळे होणारे मोठे नुकसान टाळता येऊ शकते.

वारंवार तीच तीच संकटे येतात पण संकटे येऊनही जर उपाययोजना होत नसेल आणि सरकारी यंत्रणांना जाग येत नसेल तर अवकाळीपेक्षाही अकार्यक्षम दिवाळीखोरीचा हा सगळा परिणाम ठरतो. त्याचे नुकसान सगळ्यांनाच भोगावे लागते. आताच्या काळामध्ये अतिशय वेगाने व्यवस्था उभ्या करता येऊ शकतात. परंतु सरकार त्या बाबतीत पुरेसे जागे झालेले नाही. दरवर्षी हा अवकाळी पाऊस येणार हे लक्षात घेऊन व्यवस्था व्हायला हव्यात. अगदी अंदाजपत्रकामध्ये सुद्धा अवकाळीच्या उपाययोजनांसाठी स्वतंत्र निधी राखून ठेवण्याची आवश्यकता आहे. केवळ नुकसान भरपाई देऊन उपयोगाचे नाही तर नुकसान होणारच नाही, यासाठीच्या उपाययोजनांकरिता तितक्याच ठोस प्रयत्नांची आवश्यकता आहे. अगदी क्रिकेट मैदानावरसुद्धा सामना सुरू असताना पाऊस येईल हे गृहित धरून पीच खराब होऊ नये म्हणून व्यवस्था केलेली असते. सामना सुरू असताना पावसाची चाहूल लागताच अगदी काही मिनिटांमध्ये सगळे मैदान झाकण्याची व्यवस्था केली जाते. याच पद्धतीच्या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पिकांचे संरक्षण करणाऱ्या व्यवस्थेची आवश्यकता आहे. अशा संकटांतून होणाऱ्या नुकसानीपेक्षा आधुनिक व्यवस्थांवर एकदाच केलेला खर्च शेतकऱ्यांना आणि सरकारलादेखील सहाय्यभूत ठरू शकतो. कारण नुकसान भरपाई देण्याऐवजी नुकसान टाळणारी व्यवस्था अधिक महत्त्वाची ठरू शकते. नवी संकटे आणि त्यासाठी नवे अत्याधुनिक प्रयत्न गरजेचेच ठरतात.

# शुभ वार्ता : 'लाडकी बहीण'नंतर आता 'लाडकी विद्यार्थिनी' योजना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महायुती सरकारच्या 'लाडकी बहीण' योजनेच्या यशानंतर उल्हासनगर महापालिकेने शालेय विद्यार्थिनींसाठी 'लाडकी विद्यार्थिनी योजना' घोषित केली आहे. या अंतर्गत ७ वी ते १२ वीच्या मुलींना दरमहा ५०० रुपये शिष्यवृत्ती थेट बँक खात्यात जमा होईल. मुलींचे शिक्षण टिकवून ठेवणे आणि आर्थिक मदत करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ज्यामुळे त्यांच्या शिक्षणातील गळती थांबेल.

महाराष्ट्रातील गोरगरीब महिलांना स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभं राहता यावं यासाठी महायुती सरकराने 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना सुरू केली होती. साधारण दीड-पावणेदोन वर्षापूर्वी सुरू झालेल्या या योजनेचा बराच बोलबाला झाला असून या योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या महिलाना दर महिन्याला ठराविक रक्कम दिली जाते. जवळपास अडीच कोटी महिलांनी या योजनेचा लाभ घेतला असून दर महिन्याला त्यांच्या खात्यात १,५०० रुपये जमा होता. महायुती सरकारच्या या योजनेला लाडक्या बहिणींचा मोठा प्रतिसाद मिळाला. त्यामुळे महायुतीला विधानसभा निवडणुकीत घवघवीत यशही मिळाले.

राज्य सरकारच्या 'लाडकी बहीण' योजनेला मिळालेल्या यशानंतर याच योजनेच्या धर्तीवर आता उल्हासनगर महापालिकेने शहरातील शालेय विद्यार्थिनींसाठी एक मोठे, महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे. उल्हासनगर महापालिकेने विद्यार्थिनींसाठी एक मोठी घोषणा केली आहे. त्यानुसार इयत्ता ७ वी ते १२ पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींसाठी 'लाडकी विद्यार्थिनी योजना' घोषित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत विद्यार्थिनींना आता दरमहा ५०० रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे.

उल्हासनगर महापालिकेने हे मोठ पाऊल उचलत आता 'लाडकी विद्यार्थिनी योजनेची' घोषणा केली आहे. या योजनेंतर्गत इयत्ता ७ वी ते इयत्ता १२ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनींना दर महिन्याला ५०० रुपये देण्यात येतील. लाडकी बहीण योजनेप्रमाणेच ही रक्कमही संबंधित विद्यार्थिनींच्या बँक खात्यामध्ये जमा होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार स्व. ज्योती पप्पू कलानी यांच्या नावाने ही योजना राबविली जाणार आहे. दरमहा मिळणाऱ्या या पैशांमुळे, या योजनेमुळे गोरगरीब कुटुंबांना मुलींच्या शिक्षणासाठी आधार मिळेल, असे बोलले जात आहे.

### काय आहे उद्देश?

विद्यार्थिनींच्या शिक्षणातील गळती रोखणे आणि त्यांच्या शैक्षणिक खर्चाला हातभार लावणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या अंतर्गत ७ वी ते १२ वीत शिकणाऱ्या पात्र मुलींना दरमहा ५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाईल. ही रक्कम थेट लाभ हस्तांतरण म्हणजेच डीबीटी (डायरेक्ट बेनिफीट ट्रान्सफर) द्वारे विद्यार्थिनींच्या बँक खात्यात जमा केली जाईल. आर्थिक अडचणींमुळे शिक्षण सुटणाऱ्या मुलींसाठी ही योजना म्हणजे आधारवड ठरणार आहे.

# जीम साहित्याचा दर्जा व दुरुस्तीबाबत ठेकेदाराची हमी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




शहरातील विविध जिमखान्यांना पूर्ण आलेल्या व्यायामाच्या साहित्याचा दर्जा व अदा करण्यात आलेले बिल याबाबत दै. 'ग्लोबल महातेज'ने शुक्रवारी वृत्त प्रसिद्ध केले होते. शनिवार व रविवार दोन दिवस पालिकेत कदाचित सुटीमुळे जबाबदार अधिकारी तथा माहिती देणारी सूत्रे उपलब्ध नव्हती. सोमवारी सदर वृत्ताच्या संदर्भात फॉलोअप घेतला असता सदरचे साहित्य दोन ते चार वर्षांपूर्वीच पुरवलेले आहे. त्यातील काही साहित्य नादुरुस्त असल्यास तत्काळ दुरुस्त करून देण्याची तसेच दुरुस्ती होऊ शकणार नसेल तर त्या जागी दर्जेदार कंपनीचे नवीन साहित्य देण्याची हमी ठेकेदाराने घेतली आहे. भविष्यात जिथे-जिथे जीम साहित्य पुरविले आहे त्या सर्वांनाच उत्तम सर्व्हिस देण्याची हमीही ठेकेदाराने घेतली आहे.

विशेष म्हणजे यासंदर्भात ज्या संस्थांना जीम साहित्य पुरवले आहे त्यातील जबाबदार सूत्रांपैकी कोणीही तक्रार करत नाहीत. शिवाय पुरवठादार किंवा ठेकेदार यांना जर पालिका दोन-दोन, चार-चार वर्षे बिल देत नसेल आणि त्या काळात बिल अदा करणारे अधिकारी किंवा पदाधिकारी यांच्या बदल्या होत असतील किंवा सत्तासूत्र बदलत असतील तर ठेकेदारालाही 'देणे-घेणे' करणे व्यावहारिकदृष्ट्या मोठ्या मुश्किलीचे होऊन बसते. ही बाबही या बातमीच्या निमित्ताने लक्षात आली. ज्या ठेकेदारांना बिले उशिरा मिळतात त्यांचे साहित्य, दर्जा व किंमत निश्चितपणे डोके चक्रावणारी असतात. पण त्यासाठी फक्त ठेकेदारांना जबाबदार धरता येणार नाही. पालिकेची संपूर्ण यंत्रणाच त्यात कोठे ने कोठे दोषी असण्याची शक्यता मुळीच नाकारता येत नाही.

# पुण्यात मालापारायण महोत्सव सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : प्राचीन ज्ञानाचे रक्षण व प्रसार करण्याच्या उद्देशाने आळंदी येथील आध्यात्मिक प्रतिष्ठान संस्थेतर्फे शुक्ल यजुर्वेद माध्यंदिन शाखा मालापारायण महोत्सव शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६ पासून सुरू करण्यात आला आहे. हा महोत्सव १० एप्रिल २०२६ पर्यंत सकाळी ८ ते ११ या वेळेत पुण्यातील लक्ष्मी रस्त्यावरील बेलबाग संस्थानच्या भगवान श्री विष्णू मंदिरात होत आहे. दोन पदांचा क्रम त्याच दोन पदांचा व्युत्क्रम म्हणजे उलट म्हणणे पुनश्च पूर्ववत क्रम उच्चारणे यालाच संक्रम असे म्हणतात. त्यानंतर प्रथम पद सोडून द्वितीय पद जोडून क्रमशः क्रम, व्युत्क्रम, संक्रम या क्रमाने पदांची पुष्पमाला गुंफणे यालाच मालापारायण असे म्हणतात.

सौष्ठवौदार्ययुक्त विशेषशालिनी अशी वाणी व लोकोत्तरविलक्षण मेधाशक्ती यांच्या समन्वयामुळे सिद्ध होणारे हे मालापारायण आहे. एकाकी अष्टविकृती पारायणे मधल्या काही काळात खंडित झाली होती. त्या पारायणाची पुनश्च सुरूवात स्व. विश्वनाथ केशव जोशी यांनी केली होती. त्यांची पूर्तता त्यांचा मुलगा वेदमूर्ती विवेक जोशी करीत आहेत.

# उन्हाची तीव्रता जाणवू लागल्याने उष्माघाताचा धोका उद्भवण्याची शक्यता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सध्या राज्यभर उन्हाची तीव्रता जाणवायला लागली आहे. तालुक्यातही त्याचा त्रास आता जाणवू लागला आहे. सद्य:स्थितीत ४० अंश सेल्सिअस तापमान असल्याने आगामी काळात आणखी तापमान वाढीची शक्यता लक्षात घेता नागरिकांना उष्माघाताचा त्रास बळावण्याची शक्यता आहे.

एप्रिलच्या सुरुवातीलाच जाणवणाऱ्या या तीव्र उन्हामुळे स्थानिक दवाखाने आणि शासकीय रुग्णालयात विविध आरोग्य समस्या घेऊन नागरिकाना सामोरे जावे लागत आहे. स्थानिक शासकीय रुग्णालयासह खासगी दवाखान्यांमध्ये लहान मुलांमध्ये जुलाबाचाही त्रास वाढू लागला आहे. विषाणूजन्य ताप, मळमळ, जुलाब, पोटदुखी या सारख्या आजारांचे रोज ८ ते १० रुग्ण आढळून येत आहेत. चक्कर येणे, डोकेदुखी, उलट्या, मळमळ व अशक्तपणा यांसारख्या तक्रारी घेऊन येणाऱ्या रुग्णांची संख्याही आता वाढली आहे. विशेषतः दुपारच्या कडक उन्हात बाहेर पडणाऱ्या नागरिकांना उष्माघाताचा धोका अधिक असतो, असे डॉक्टरांकडून सांगण्यात आले.

> सध्या तापमानात लक्षणीय वाढ होत आहे. त्याअनुषंगाने आगामी काळात नागरिकांनी काळजी न घेतल्यास उष्माघाताचा त्रास होऊन रुग्णसंख्या वाढीस लागू शकते. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेत दुपारच्या वेळेत बाहेर पडणे टाळावे. कोणतीही लक्षणे जाणवल्यास तत्काळ वैद्यकीय उपचार घ्यावेत अथवा योग्य तो सल्लाही घ्यावा.
> **– डॉ. जे. एम. पाटील–**
> वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, अमळनेर




दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो बाहेर पडणे टाळावे. भरपूर पाणी व द्रवपदार्थांचे सेवन करावे. त्यात लिंबू-पाणी, चिंचपन्हे, ओ. आर. एस. पाणीत मिसळून पिणे, डोक्यावर टोपी किंवा रुमाल वापरावा. हलके व सैल कपडे परिधान करावेत. लहान मुले व वृद्धांची विशेष काळजी घ्यावी.परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता प्रशासनाने तातडीने 'उष्माघात कक्ष' कार्यान्वित करावा, अशी मागणी शहरातील नागरिकांकडून केली जात आहे.

**ग्रामपंचायत पोटनिवडणूक**

# उमेदवारी अर्ज आजपासून दाखल होणार

## सुट्यांमुळे उमेदवारांची धावपळ; मतदान २८, तर मतमोजणी २९ एप्रिलला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव जिल्ह्यातील ८९ ग्रामपंचायतींमधील सरपंच आणि सदस्य पदाच्या रिक्त १०५ जागांसाठी पोटनिवडणुकीचे बिगुल वाजले आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया ७ तारखेपासून सुरू होत आहे. अर्ज भरण्यासाठी सात दिवसांचा कालावधी असला तरी दोन दिवस सार्वजनिक सुट्या आल्याने इच्छुकांना प्रत्यक्ष पाचच दिवस मिळणार आहेत.

जिल्ह्यातील ८९ ग्रामपंचायतींत एकूण ९२ सरपंच पदे आणि ९२ सदस्य पदे रिक्त आहेत. यासाठी सुरुवातीला प्रभाग रचनेचा कार्यक्रम पार पडल्यानंतर आता प्रत्यक्ष निवडणुकीची धामधूम सुरू झाली आहे. सहा तालुक्यांत लोकनियुक्त सरपंच पदासाठी पोटनिवडणूक होणार नसली तरी, जिल्ह्यात सर्वच तालुक्यांत काही ग्रामपंचायतींत सदस्यपदासाठी चुरस पाहायला मिळणार आहे. या सर्व जागांसाठी २९ रोजी मतदान प्रक्रिया पार पडेल. २९ रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाणार आहे. प्रशासकीय पातळीवर निवडणुकीची तयारी पूर्ण झाली असून, इच्छुकांनी वेळेत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### १३ एप्रिलपर्यंत भरता येणार अर्ज


शनिवार, रविवारी असेल सुटी उमेदवारी अर्ज भरण्याची सुरुवात ७ एप्रिलपासून तर अंतिम मुदत १३ एप्रिलपर्यंत आहे. ७ ते १३ एप्रिल या कालावधीत ११ आणि १२ तारखेला अनुक्रमे शनिवार आणि रविवार येत आहे. सुटीच्या दिवशी निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. परिणामी सात दिवसांच्या निर्धारित वेळेपैकी दोन दिवस सुटीत जाणार असल्यामुळे उमेदवारांच्या हातात आता केवळ पाच दिवस शिल्लक आहेत.

# संतश्री सखाराम महाराज यात्रोत्सवासाठी प्रशासन सज्ज

## माजी आमदार शिरीषदादा चौधरी, नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांच्याकडून यात्रास्थळाची पाहणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खानदेशातील 'प्रतिपंढरपूर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संतश्री सखाराम महाराज यात्रोत्सवाचा उत्साह आता शिगेला पोहोचला आहे. यात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाविकांची सुरक्षा, आरोग्य आणि सोयी-सुविधांमध्ये कोणतीही उणीव राहू नये, यासाठी माजी आमदार शिरीषदादा चौधरी आणि नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांनी सोमवार, दि. ६ एप्रिल रोजी बोरी नदीपात्रातील यात्रास्थळासह मंदिर परिसराची पाहणी केली.



*अमळनेर : संतश्री सखाराम महाराज यात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी माजी आमदार शिरीषदादा चौधरी व नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांनी यात्रास्थळाची पाहणी केली. याप्रसंगी उपस्थित उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, नगरसेवक गुलाब पाटील, अबू महाजन, श्रीराम चौधरी, नवीद शेख, कैलास पाटील, सूरज परदेशी आदी नगरसेवकांसह मुख्याधिकारी गणेश शिंदे.*

बोरी नदीपात्रात भरणाऱ्या या यात्रेत दरवर्षी लाखो भाविक हजेरी लावतात. यंदाही यात्रेचे स्वरूप मोठे असल्याने माजी आमदार चौधरी यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा करून मार्गांचे नियोजन, पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि स्वच्छतेवर विशेष भर देण्याच्या सूचना दिल्या. अमळनेरची यात्रा ही केवळ धार्मिक उत्सव नसून खानदेशच्या संस्कृतीचे प्रतीक आहे. भाविकांना दर्शनासाठी तासन्‌तास थांबावे लागू नये आणि गर्दीवरील नियंत्रण सुरळीत व्हावे, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, असे माजी आमदार चौधरी यांनी सांगितले. नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांनी नगरपालिका प्रशासनाला यात्रोत्सवादरम्यान शहरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. प्रकाश व्यवस्था, यात्रा परिसरात हायमास्ट दिवे व गल्ल्यांमध्ये पुरेशी रोषणाई,आरोग्य सुविधा, ठिकठिकाणी तात्पुरती आरोग्य केंद्रे व रुग्णवाहिका सेवा तसेच यात्रेकरूंना मोकळा मार्ग मिळावा यासाठी रस्त्यांवरील अतिक्रमणांवर कारवाई यासह सुरक्षा व वाहतूक नियंत्रणावर भर देण्यात येणार आहे. पोलीस प्रशासन देखील चोख सुरक्षा व्यवस्था देणार आहेत. याकरिता सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढवणे, साध्या वेशातील पोलिसांची गस्त वाढवणे तसेच यात्रेतील पाळणे, खेळणी व इतर दुकानांचे सुरक्षा ऑडिट करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

यावर्षी रथोत्सव २७ एप्रिल रोजी आणि पालखी सोहळा १ मे रोजी होणार आहे. या पाहणी दौऱ्यावेळी उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, नगरसेवक गुलाब पाटील, अबू महाजन, श्रीराम चौधरी, नवीद शेख, कैलास पाटील, सूरज परदेशी, आदी नगरसेवक, मुख्याधिकारी गणेश शिंदे, सर्व विभागांचे प्रमुख, सामाजिक कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# पहिल्या प्रयत्नातच उत्तीर्ण होऊन ‘आयएफएस’!

## पदवीच्या शेवटच्या वर्षातच केली यूपीएससीसाठीची तयारी

सक्सेस स्टोरी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

यूपीएससीची परीक्षेला देशभरातून हजारो विद्यार्थी बसत असतात. परंतु फारच कमी लोक या परीक्षेत यश मिळवू शकतात. ही परीक्षा देशातील सर्वांत अवघड आणि आत्मसंतुलनाची परीक्षा पाहणारी परीक्षा असते. यात मुस्कान हीने २२ व्या वर्षी पहिल्याच प्रयत्नात ही परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

यूपीएससीच्या परीक्षेत बसून यश मिळवणे सोपे नाही. मोठ्या पदाची सरकारी नोकरी आणि अन्य सुविधांसाठी हजारो तरुण दरवर्षी या सर्वांत अवघड परीक्षेस बसत असतात. मोजक्या लोकांना या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश मिळते. अनेक जण बरेच प्रयत्न करुनही यश मिळवू शकत नाहीत. हिमाचल प्रदेशातील मुस्कान जिंदल हीने केवल २२ व्या वर्षात पहिल्या प्रयत्नात यूपीएससीची सिव्हील सेवा परीक्षा पास केली आहे. तिची आयएएस बनण्याची इच्छा होती. परंतु तिने आयएएस ऐवजी भारतीय विदेश सेवा म्हणजेच ‘आयएफएस’ निवड केली आहे.

मुस्कान लहानपणापासून अभ्यासात हुशार होती. तिने सुरूवातीलाच सिव्हील सेवेत जायचे असे ठरविले होते. १२ वीमध्ये तिला ९६ टक्के मिळाले होते. त्यानंतर ती अभ्यासासाठी चंडीगड येथे गेली. जेथे तिने एस. डी. कॉलेजमधून बी.कॉम. (ऑनर्स) केले. कॉलेजातही तिने तिची बुद्धिमत्ता दाखविली आणि ग्रॅज्युएशनमध्ये टॉप आली.

### ऑल इंडिया ८७ वी रँक मिळविली

मुस्कान हीने पदवीच्या अंतिम वर्षाला असतानाच यूपीएससीची तयारी सुरू केली होती. रोज ४ ते ५ तास अभ्यास करून ती तिच्या ध्येय्याकडे चालली होती. ग्रॅज्युएशन पूर्ण झाल्यानंतर वय कमी असल्याने लगेच तिला परीक्षेस बसता आले नाही. परंतु यावेळेचा उपयोग करून अभ्यास सुरूच ठेवला. २०१९ मध्ये मुस्कानने पहिल्यांदा यूपीएससीची परीक्षा दिली आणि पहिल्याच प्रयत्नात यश मिळविले. तिला ऑल इंडिया ८७ रँक मिळाली. त्यानंतर तिने भारतीय विदेश सेवा (आयएफएस) क्षेत्र निवडले.

### मोबाईल आणि इंटरनेटचा योग्य वापर

आयएफएस मुस्कान जिंदल हीने तिच्या यशाला स्वयंशिस्त आणि सेल्फ कंट्रोल जबाबदार असल्याचे म्हटले आहे. तिने मोबाईल आणि इंटरनेटचा योग्य वापर करुन अभ्यासातून लक्ष भटकू दिले नाही. अभ्यास आणि मानसिक संतुलनाचा चांगला ताळमेळ राखला. आपल्या यशा कुटुंबियांची साथ जबाबदार असल्याचे ती म्हणते. आई-वडीलांनी नेहमी आत्मविश्वास वाढवला, प्रत्येक पावलांवर तिला साथ दिली आहे. आज मुस्कान केवळ आयएफएस अधिकारीच नाही तर तरुणांचे प्रेरणास्थान आहे.

---

## जागतिक आरोग्यदिन विशेष

# आरोग्य हेच खरे धन!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी ७ एप्रिल रोजी जागतिक आरोग्य दिन साजरा केला जातो. या दिवसाचे आयोजन जागतिक आरोग्य संघटना करते. या दिनाचा मुख्य उद्देश म्हणजे जगभरातील लोकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे आणि निरोगी जीवनशैलीचा प्रसार करणे हा आहे.

### आरोग्याचे महत्त्व

आरोग्य म्हणजे केवळ रोग नसणे नव्हे, तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या पूर्णपणे सक्षम असणे होय. आधुनिक जीवनशैलीत वाढलेला ताण, अपुरी झोप, चुकीचा आहार आणि व्यायामाचा अभाव यामुळे अनेक आजार वाढताना दिसतात. त्यामुळे ‘आरोग्य हेच खरे धन’ ही म्हण आज अधिकच महत्त्वाची ठरते.

### जागतिक आरोग्य दिनाची थीम

दरवर्षी डब्ल्यूएचओ एक विशिष्ट थीम जाहीर करते. या थीमद्वारे एखाद्या महत्त्वाच्या आरोग्यविषयक समस्येकडे जागतिक लक्ष वेधले जाते.

**उदाहरणार्थ–**
मानसिक आरोग्य, माता व बाल आरोग्य, सार्वत्रिक आरोग्य सेवा, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजार,

### सध्याच्या आरोग्य समस्या

आजच्या काळात काही गंभीर आरोग्य समस्या पुढे येत आहेत. मधुमेह, हृदयविकार यांसारखे असंसर्गजन्य आजार, तणाव, नैराश्य यांसारख्या मानसिक समस्या.

### प्रदूषणामुळे होणारे श्वसनाचे विकार

बदलती जीवनशैली व जंक फूडचा वाढता वापर आणि त्यात प्रदूषणामुळे श्वसनाचे विकार प्रामुख्याने जडतात.



त्यासाठी जंकफूड खाण्यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

### निरोगी जीवनासाठी उपाय

निरोगी राहण्यासाठी खालील गोष्टींचा अवलंब करणे आवश्यक आहे.
संतुलित आहार फळे, भाज्या, प्रथिनेयुक्त अन्न यांचा समावेश.

**नियमित व्यायाम**
– दररोज किमान ३० मिनिटे व्यायाम

**पुरेशी झोप ;**
७ ते ८ तास झोप आवश्यक

**ताण नियंत्रण :**
योग, ध्यान, छंद जोपासणे

**स्वच्छता :**
वैयक्तिक व परिसराची स्वच्छता राखणे नियमित आरोग्य तपासणी आजारांचे लवकर निदान करणे.

### समाजाची भूमिका

आरोग्य ही केवळ वैयक्तिक जबाबदारी नसून सामाजिक जबाबदारीही आहे. सरकार, आरोग्य संस्था, शाळा आणि नागरिक यांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यासच “सर्वांसाठी आरोग्य” हे उद्दिष्ट साध्य होऊ शकते.

### निष्कर्ष

जागतिक आरोग्य दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्यापुरता मर्यादित नसून, तो आपल्या जीवनशैलीत सकारात्मक बदल घडवण्याची प्रेरणा देणारा आहे. निरोगी शरीर आणि निरोगी मन हेच आनंदी जीवनाचे खरे रहस्य आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या आरोग्याची काळजी घेऊन इतरांनाही त्यासाठी प्रेरित करणे गरजेचे आहे.
“स्वास्थ्य राखा, जीवन समृद्ध करा!”

---

# ‘ओळख असतानाही काहींनी मला काम दिले नाही’

## स्ट्रगलबद्दल स्पष्टच बोलली सैराट फेम रिंकू राजगुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रिंकू राजगुरूने एका मुलाखतीमध्ये तिच्या संघर्षाबद्दल सांगितले आहे. काहींनी ओळख असूनही तिला सिनेमात घेतले नाही, असे रिंकूने म्हटले आहे. मराठी अभिनेत्री रिंकू राजगुरूला ‘सैराट’ या सिनेमाने रातोरात प्रसिद्धी मिळाली आणि ती घराघरांत पोहोचली. ‘सैराट’ सिनेमानंतर रिंकूने काही सिनेमांमध्ये काम केले. त्यातील काही सिनेमांना प्रेक्षकांचे भरघोस प्रेम मिळाले तर काही सिनेमे फ्लॉप झाले. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये रिंकूने स्ट्रगलबद्दल भाष्य केले आहे.

### स्ट्रगलबद्दल काय म्हणाली रिंकू राजगुरू?

एका मुलाखतीमध्ये रिंकू राजगुरू म्हणाली, की ‘सैराट इतका हिट झाला, पण त्यानंतर मी चांगल्या कलाकारांसोबत काम का नाही केले? खूप चांगले दिग्दर्शक आहेत त्यांनी मला कधीच का नाही घेतले. हे प्रश्न मला कायम पडतात. ऑडिशन्स मी आताही देतेय, त्यामुळे ते टिकवून कसे ठेवू, हासुद्धा वेगळा स्ट्रगल असतो. त्यामुळे स्ट्रगल कुणालाच नाही चुकत.’

‘लोकांना असे वाटते, की हे खूप सहज मिळाले आहे. पण ज्यावेळी ते काय आहे हे माहितीच नाही, ते सहज मिळाल्यावर हाताळणेही कठीण असते. मी नेहमी म्हणते, तुम्ही पायऱ्या चढत-चढत वर जाता, डायरेक्ट तुम्हाला वर नेऊन ठेवले आणि संपूर्ण जग दिसते आहे, तर कळत नाही ना, काय करायचे. तसेच अनुभवातून मी शिकत आले.’ असे रिंकू पुढे म्हणाली.

फेमबद्दल बोलताना रिंकू म्हणाली, की ‘मला नाहीच वाटत, मी कोणी आहे. मी कायम मागे असते. मला जर कोणी भेटले तर मी सांगते, की तुमच्याकडे चांगले काम असेल तर मला सांगा. मला सगळे ओळखत होते, पण ते माझ्याकडे नाही आले. काहींना असे वाटले ही एकाच प्रकारची भूमिका करते. त्यामुळे ज्याला ज्याच्यासोबत काम करायचे, ते त्याच्याचसोबत करतात.’

दरम्यान, रिंकू राजगुरूच्या कामाबद्दल सांगायचे तर तिने ‘कागर’, ‘झुंड’, ‘झिम्मा २’, ‘आशा’ यांसारख्या सिनेमांमध्ये काम केले आहे. अभिनेत्री शेवटची ‘पुन्हा साडे माडे तीन’ या सिनेमामध्ये दिसली असून तिच्यासोबत या सिनेमात भरत जाधव, अशोक सराफ आणि मकरंद अनासपुरे यांच्याही मुख्य भूमिका होत्या.



---

# हॉर्नचा आवाजच नाही, पक्ष्यांचा तेवढा कलकलाट असतो

## जगातील सर्वांत शांत गिएथूर्न या शहराला एकदा भेट द्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एकीकडे लोक घड्याळ्याच्या काट्यावर धावतात, मिनिट काय सेंकदाला देखील महत्त्व देतात. मात्र जगात एक असे शहर आहे जेथे लोकांना सर्वांत मोठा आवाज हा बोट पाण्यात वल्हवण्याचा असतो किंवा पक्ष्यांच्या किलबिलाटाचा...कोणते हे शांत शहर आहे जाणून घेऊया...

मुंबई आणि दिल्लीसारख्या महानगरात सकाळपासून रात्रीपर्यंत हॉर्नचा गोंधळ आणि ट्रॅफीक जामच कटकट असते. येथे हवेत ऑक्सिजन कमी आणि कार्बनच अधिक असतो. समजा सकाळी तुम्ही झोपेतून जागे व्हाल आणि खिडकी उघडाल तर वाहनांच्या हॉर्नऐवजी पाण्याचा झुळूझुळू आवाज येत असेल आणि सोबत पक्ष्यांचा किलबिलाट..ऑफीसला जाण्यासाठी कार नव्हे तर छोटीशी इलेक्ट्रीक बोट गॅरेजमध्ये असेल. ही कोणती काल्पनिक कथा नसून असे शहर जगात आहे. नेदरलँड येथील गिएथूर्न भागाचे रोजचे जगणे आहे. येथील जीवन इतके निवांत आहे कि यास नॉर्थचे व्हेनिस म्हटले जाते. आजच्या जगात दोन मोठ्या समस्या आहेत. एक ग्लोबल वॉर्मिंग आणि मानसिक तणाव. गिएथूर्नचे जीवन समाधानाचे आहे.

शहर म्हटले की डोक्यात फ्लायओव्हर्स, ट्रॅफीक सिग्नल आणि प्रदुषणाचे धुकं असते. परंतू या भागात एकही रस्ता नाही. एका घरातून दुसऱ्या घरात जाण्यासाठी नावेचा उपयोग केला जातो. किंवा लाकडी पुलांचा वापर करुन प्रवास करावा लागतो. लोक त्यांचा किराणा ते फर्निचर नावेतूनच येथून तेथे नेतात. येथील सरकारने रस्त्यांचा प्रस्ताव यासाठी ठोकरुन लावला की त्यांची शांतता भंग होईल. येथे ज्या होड्या चालवल्या जातात. त्यांनाही इलेक्ट्रीक मोटर असल्याने त्यांचा आवाज होत नाही. त्यांना ‘व्हीस्पर बोट्स’ असे म्हटले जाते. या बोटी जराही आवाज करत नाहीत. या



गावातील हवा इतकी शुद्ध असते की शहरातून आलेल्यांना पहिल्यांदा आपले श्वास जड वाटतात.


### ‘व्हीस्पर बोट्स’ प्रत्येकाच्या दारी

येथे जोराचा येणारा आवाज फार तर एखाद्या पक्षाचा असू शकतो किंवा नावेच्या वल्हवण्याचा..येथे लोक पायी चालणे, सायकल किंवा नावेच्या आधारे प्रवास करणे पसंद करतात.अनेक लोकांनी ऑफीसला जाण्यासाठी पदरी या ‘व्हीस्पर बोट्स’ बाळगल्या आहेत. त्यांना कार्यालयात जाण्यासाठी १० मिनिटेही पुरेशी आहेत. कारण येथे कोणताही ट्रॅफीक जाम नाही. येथे इमर्जन्सी मदतीसाठी मात्र एम्ब्युलन्स बोटी जरुर आहेत.

या ठिकाणच्या लोकांनी त्यांची मुळं आणि निसर्ग जपून ठेवला आहे. परिणामी, जेव्हा उर्वरित जग उष्णतेच्या लाटा, नैराश्य आणि प्रदुषणाचा सामना करीत असताना येथील लोक आपल्या बोटींतून शांतपणे विहार करीत आहेत. येथील स्थानिक रहिवाशांना वातानुकूलित यंत्रणांची काहीच गरजच भासत नाही; कोणत्याही आधुनिक यांत्रिक साहित्याच्या मदतीशिवाय हे लोक अत्यंत समाधानाने जीवन जगत आहेत.. या ठिकाणचे ‘जलमार्ग’च अद्वितीय आहेत असे नाहीतर येथील घरेही तितकीच खास आहेत. प्रत्येक घराचे छप्पर गवताने शाकारलेले असते. प्रत्येक घरासमोर एक सुंदर बाग वसलेली असते, जी थेट नदी वा कालव्याच्या पाण्यापर्यंत पसरलेली असते.

---

# भारताच्या ‘या’ टोकावरील जमातीच्या लोकांचे आयुष्य १०० वर्षांपेक्षा जास्त



## सत्तरीनंतरही बायका दिसतात चिरतरुण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताच्या शेवटच्या टोकावर एक असा समुदाय राहतो जेथील लोक १०० वर्षांपेक्षा जास्त आयुष्य जगतात. तेथील महिलांमध्ये सत्तर वयानंतरही तरुण असल्यासारखी एनर्जी असते.

भारताच्या सीमेजवळच वसलेल्या लडाख आणि कारगिल क्षेत्रातील आर्यन व्हॅली ही एक अशी जागा आहे, जेथे राहणारी ‘ब्रोकपा’ जमात त्यांच्या विलक्षण दीर्घायुष्यासाठी आणि चिरतरुण सौंदर्यासाठी जगप्रसिद्ध आहे. या जमातीतील लोक १०० वर्षांहून अधिक काळ जगतात आणि विशेष म्हणजे वयाच्या ७०-८० व्या वर्षीही ते ३० वर्षाच्या तरुणांप्रमाणे उत्साही आणि देखणे दिसतात. स्वतःला अलेक्झांडर द ग्रेटच्या सैनिकांचे वंशज मानणाऱ्या या लोकांचे निळे डोळे, गोरा वर्ण आणि उंच शरीरयष्टी त्यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवते.

या लोकांच्या सौंदर्याचे आणि आरोग्याचे सर्वात मोठे रहस्य त्यांच्या आहारात दडलेले आहे. ब्रोकपा लोक पूर्णपणे शुद्ध शाकाहारी आणि ऑर्गनिक अन्नावर भर देतात. त्यांच्या आहारात मुख्यत्वे सातू, स्थानिक भाज्या आणि प्रामुख्याने बदाम व अक्रोड यांचा समावेश असतो. विशेष म्हणजे ते अन्नामध्ये फारसे तेल किंवा मसाले वापरत नाहीत. ही जमात ‘गोंध’ नावाची एक विशिष्ट प्रकारची स्थानिक चहा पिते, जी औषधी वनस्पतींपासून बनविलेली असते आणि शरीरातील विषारी घटक बाहेर काढण्यास मदत करते.

केवळ आहारच नाही, तर या लोकांची जीवनशैलीही अत्यंत शिस्तबद्ध आहे. आर्यन व्हॅलीचे दुर्गम भौगोलिक स्थान आणि तेथील शुद्ध हवा यामुळे ते प्रदूषणापासून पूर्णपणे दूर राहतात. कडाक्याच्या थंडीतही हे लोक शारीरिक कष्ट आणि डोंगरदऱ्यांतून मैलोन्मैल चालणे कधीच थांबवत नाहीत. निसर्गाशी असलेले त्यांचे अतूट नाते आणि मानसिक शांतता त्यांच्या चेहऱ्यावर कधीही सुरकुत्या पडू देत नाही. आजही या जमातीतील वृद्ध माणसे कोणत्याही आधुनिक औषधांशिवाय डोंगर चढून जातात.

ब्रोकपा लोकांच्या दीर्घायुष्यामागे त्यांच्या पूर्वजांकडून मिळालेले ‘अनुवांशिक गुण’ हे देखील एक महत्त्वाचे कारण मानले जाते. या जमातीने शतकानुशतके स्वतःला बाह्य जगापासून वेगळे ठेवले असून ते आपल्या समुदायाबाहेर लग्न करत नाहीत. यामुळे त्यांचे शुद्ध आर्यन जनुके टिकून राहिले आहेत. निसर्गाचा आदर, साधी राहणी आणि कोणत्याही आधुनिक तणावाचा अभाव यामुळे ही जमात आजही ‘जगातील सर्वात सुंदर आणि निरोगी’ मानवांचे जीवंत उदाहरण म्हणून ओळखली जाते.


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# दत्तरूपाची महतीच न्यारी!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

दत्त महाराजांच्या त्रिशूलधारी रूपाचे वर्णन गुरुचरित्रात अनेकदा आहे. मात्र, प्रत्येक ठिकाणी या रूपाचे भाव आणि तात्कालिक कारण वेगवेगळे आहे. अत्यंत आक्रमक आणि आवेशपूर्ण असे रूप गुरुचरित्राच्या दहाव्या अध्यायात दिसून येते. वल्लभेशाचा शिरच्छेद करताच त्याच्या आर्त हाकेला धावून येत महाराज तत्काळ तेथे प्रकट झाले.

**भक्त जनांचा कैवारी। श्रीपादराव कुरवपुरी। पावला त्वरित वेषधारी। जटामंडीत भस्मांकित॥ त्रिशूळ खट्वांग घेऊनि हाती। उभा ठेला तस्करा पुढती॥**

जटाजूट असलेले, भस्म धारण केलेले, दोन्ही हातात आयुधे – एका हातात त्रिशूल तर दुसऱ्या हातात खट्वांग. या त्रिशुळाच्या धारेचे वर्णन समश्लोकीत तिग्म धारेण असे केले आहे. अत्यंत



तीक्ष्ण अशी धार असलेले. या शस्त्राने तत्काळ दोन चोरांचा वध केला. दत्त महाराजांच्या दर्शनाचे भाग्य या चोरांच्या नशिबात होते. यातील तिसऱ्या चोराचे भाग्य अधिकच म्हणावे लागेल. जीवरक्षणार्थ पाय धरून प्रार्थना करता आली, दत्त महाराज त्याच्याशी संवाद साधते झाले. काही काळ त्यांचा सहवास मिळाला. आणखी काय हवे? वल्लभेशाला पुनश्च जीवन प्राप्त झाल्यावर त्याच्या प्रश्नावर हा चोर उत्तरला,

**झाले अभिनव परियेसी। आला होता एक तापसी॥ हा तापसी कोण होता? न कळे कवण मुनी बळी॥ यावर चोर पुढे वल्लभेशाला म्हणतोय, होईल ईश्वर त्रिपुरारी। भस्मांगी होय जटाधारी। तुझी भक्ती निर्धारी। म्हणोनि आला ठाकोनिया॥**

अरे ब्राह्मणा, तुझी भक्ती थोर आहे. गुरुचरित्रात श्रीपाद श्रीवल्लभ दत्त महाराजांना राव ही उपाधी दिली आहे. राव म्हणजे राजा. जगाचे राजे असणारे महाराज आपल्या भक्तांच्या रक्षणार्थ नित्य धावून येत असतात. अहो, आपल्या बाळाला कोणी एखादी चापटी जरी दिली तरी आपल्या मनात अत्यंत क्रोध उत्पन्न होतो. काय अधिकार आहे? कोण तुम्ही? मी पिता या नात्याने त्याचे रक्षण करण्यास समर्थ आहे. हीच भावना येथे दत्त महाराजांची दिसून येते, आपल्या भक्ताला उपद्रव देणाऱ्या अभक्तांना दत्त महाराज क्षमा करीत नाहीत.

**श्री गुरुदेव दत्त!!!**




ग्लोबल महातेज वृत्तसेवा

या जगात देवाची भक्त 'शबरी'चे नाव कुणाला माहीत नाही. शबरी 'शबर' जातीतील साधी मुलगी होती. तसे पाहिले तर 'शबर' जातीचे लोक मुळातच कुरूप असतात; पण शबरीला शबर जातीचे लोकच तिच्या कुरूपतेमुळे स्वीकारत नव्हते. जसजशी शबरी मोठी होत होती, तशी तिच्या आई-वडिलांना तिच्या लग्नाची चिंता सतावू लागली.

खूप शोधल्यानंतर शबरीचे लग्न शबर जातीतील एका मुलाशी लावून देण्यात आले आणि रात्रीच तिला त्या मुलासोबत सासरी पाठविण्यात आले. शबरी मुलाच्या मागे-मागे चालत होती. शबरी आणि तिचे पती दोघेही दंडक वनात पोहोचले. चालता-चालता सूर्योदय झाला. शबरीच्या पतीने जेव्हा मागे वळून पाहिले तेव्हा शबरीची कुरूपता पाहून तो भयभीत झाला. त्याला असे वाटले, की ही एखादी हडळ आहे, जी मला खाण्यासाठी येत आहे. त्यामुळे तो भयभीत होऊन पळू लागला. आता तर शबरीचे माहेरही सुटले होते आणि तिला आपले सासरचे घरही माहीत नव्हते. अशा स्थितीत तिने कुठे जावे. शबरी खूपच हतबल व असहाय्य झाली.

दंडक वनात राहणारे लोक शबरीला अस्पृश्य मानून तिचा तिरस्कार करू लागले; परंतु मतंग नावाच्या एका वृद्ध ऋषीने शबरीवर दया दाखविली. ते तिला आश्रमात घेऊन गेले. शबरी अस्पृश्य जातीची होती. त्यामुळे दुसऱ्या ऋषींनी तिला आश्रमात आणायला खूप विरोध केला; पण मतंग ऋषींनी शबरीला मुलगी मानून तिला आपल्याजवळच ठेवले.

शबरीला दुसऱ्याची सेवा करण्यात खूप सुख आणि आनंद मिळत होता. ऋषी-मुनींच्या तिरस्काराच्या भीतीने ती त्यांची लपून-छपून सेवा करत होती. सगळे ऋषी पंपा सरोवरावर स्नान करण्यासाठी जात असत. त्यामुळे शबरी ते उठण्याच्या आधीच ते ज्या रस्त्यावरून जात तो रस्ता झाडून घेत असे. त्याच्यावरील दगड बाजूला उचलून टाकीत असे; पण ऋषीच्या समोर येत नसे. कारण तिच्या सावलीने ऋषी-मुनी अशुद्ध होऊ नये याची ती काळजी घेत असे.

काळ कुणासाठी थांबत नाही. मतंग ऋषीच्या शेवटच्या घटका जवळ आल्या. शबरी खूप रडली. शबरीला रडताना पाहून मतंग ऋषीने तिला समजावले, 'मुली, तू चिंता करू नकोस. एके दिवशी देव स्वतः तुझ्याजवळ येतील'. अशा प्रकारे एके दिवशी मतंग मुनी शबरीला एकटे सोडून या जगातून निघून गेले. प्रतीक्षेला सर्वांत मोठी साधना म्हटले जाते. शबरी देवाचे ध्यान, भजन करत. त्यांच्या येण्याची वाट पाहू लागली. रात्री झोपल्यानंतर थोडीशीही चाहूल लागताच ती प्रभू श्रीरामचंद्र तर आले नाही ना हे दरवाजा उघडून बघू लागली. दररोज ताजे फळ आणत असे आणि कुटीच्या बाहेर रोज फुले पसरवून ठेवत असे. तिने मनोमन ठरविले होते, की श्रीरामचंद्र आल्यानंतर ती त्यांना जेवू घालेल.

एके दिवशी मतंग मुनीचे वचन खरे झाले आणि शबरीची प्रतीक्षाही संपली. श्रीरामचंद प्रभू शबरीच्या कुटीत आले. भगवान श्रीरामही शबरीला भेटण्यासाठी फार उत्सुक होते. श्रीरामाचे दर्शन घेऊन शबरी धन्य झाली. तिने श्रीरामाचे पाय धुऊन त्यांना आसनावर बसवले आणि प्रेमाने त्यांना फळे खाऊ घालू लागली. शबरी आधी ते फळ गोड आहे की नाही हे स्वतः बघायची आणि नंतरच त्यांना देत असे. जसे आई मुलाला जेवू घालून आनंदित होते, तसेच शबरीही श्रीरामाला फळे खाऊ घालून प्रसन्न होत होती.

# संख्या महात्म्य

**संख्या १८**

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अठरा कारखाने**

१ उष्ट, २ खबुतर, ३ जनान, ४ जवाहीर, ५ जामदार, ६ चिकीर, ७ तालीम, ८ तोफ, ९ थट्टी, १० दप्तर, ११ दारू, १२ दिवान, १३ नगार, १४ पील, १५ फरास, १६ बंदी, १७ मोदी व १८ शिकार, असे अठरा कारखाने मराठ्यांच्या राजवटींत सरकारी असून त्यांवर स्वतंत्र अधिकारी असत.

**अठरा गृह्यसूत्रे**

१ बौधायन, २ आपस्तंब, ३ सत्याषाढ, ४ द्राह्यायण, ५ शांडिल्य, ६ आगस्त्य, ७ आश्चलायन, ८ शांभव, ९ कात्यायन ही नऊ पूर्वगृह्यसूत्रें आणि १० वैखानस, ११ शौनकीय, १२ भारद्वाज, १३ अग्निवैश्य, १४ जैमिनीय, १५ वाधूल, १६ माध्यांदिन, १७ कौंडिण्य व १८ कौषीतकी. ही नऊ अपरगृह्यसूत्रें होत. (म. ज्ञा. को. वि. १२)

**अठरा ज्योतिषशास्त्रप्रवर्तक**

१ सूर्य, २ पितामह, ३ व्यास, ४ वसिष्ठ, ५ अत्री, ६ पराशर, ७ कश्यप, ८ नारद, ९ गर्ग, १० मरिची, ११ मनु, १२ अंगिरा, १३ लोमश, १४ पुलिश, १५ च्यवन, १६ पवन, १७ भृगु व १८ शौनक.

लोमशः पुलिशश्चैव
च्यव्नःपवनो गुरुः (भृगुः)।
शौनकोऽष्टादशैवैते
ज्योतिःशास्त्रविशारदाह॥ (सम्प्रदायवृत्तम् )

**अठरा तत्त्वें लिंगशरीराचीं**

१ बुद्धी, २ अहंकार, ३ मन, ५ पंचज्ञानेंद्रियें, ५ कर्मेंद्रियें व ५ पंचतन्मात्रा या अठरा तत्त्वाचे लिंग अथवा सूक्ष्म शरीर तयार होते, असे वेदांतशास्त्र मानते.

**अठरा दोष मोक्ष प्राप्तीच्या आड येणारे**

१ क्षुधा, २ तृषा, ३ जरा, ४ रोग, ५ जन्म, ६ मरण, ७ भय, ८ मद, ९ राग, १० द्वेष, ११ मोह, १२ चिंता, १३ अरती, १४ निद्रा, १५ विस्मय, १६ विषाद, १७ स्वेद व १८ खेद.

**अठरा धान्ये**

१ गहू, २ साळ, ३ तूर, ४ जव, ५ जोंधळा, ६ वाटाणा, ७ लाख, ८ चणा, ९ जवस, १० मसूर, ११ मूग, १२ राळा, १३ तीळ, १४ हरीक, १५ कुळीथ, १६ सांबा, १७ उडीद व १८ चवळी. यात नऊ एकदल व नऊ द्विदल धान्ये आहेत.

गोधूमशालितुवरीयवयावनाल –वातनलंकचणकाअतसामसूराः ॥ मुद्रप्रियंगुतिलकोद्रवकाः कुलित्थाः । श्यामाकमाषचवला इतिअ धान्यवर्गः ॥

**अठरा तारू – अलुतेदार**

१ तेली, २ तांबोळी, ३ साळी, ४ सनगर, ५ शिंपी, ६ माळी, ७ गोंधळी, ८ डौरी, ९ भाट, १० ठाकर, ११ गोसावी, १२ जंगम, १३ मुलाणी, १४ वाजंत्री, १५ घडशी, १६ कलावंतु, १७ तराळ किंवा कोरबू आणि १८ भोई (गावगाडा).

**अठरा नावे ( श्रीगीतेची )**

१ गीता, २ गंगा, ३ गायत्री, ४ सीता, ५ सत्या, ६ सरस्वती, ७ ब्रह्मविद्या, ८ ब्रह्मवल्ली, ९ त्रिसंध्या, १० मुक्तिगोहिनी, ११ अर्धमात्रा, १२ चिदानंदा, १३ भवघ्नी, १४ भयनाशिनी, १५ वेदत्रयी, १६ परानन्ता, १७ तत्त्वार्थ व १८ ज्ञानमंजिरी.

गीता गङ्गा च गायत्री सीता सत्या सरस्वती ।
ब्रह्मविद्या ब्रह्मवल्ली त्रिसंध्या मुक्तिगोहिनी ॥
अर्धमात्रा मिदानंदा भवघ्नी भयनाशिनी ।
वेदत्रयी परानन्ता तत्त्वार्थज्ञानमंजिरी ॥ ( कल्याण गीतातत्त्वांक )

**अठरा नावे ( शिवाची )**

१ शिव, २ पशुपती, ३ मृत्युंजय, ४ त्रिनेत्र, ५ कृतिवास, ६ पंचवक्त्र, ७ शितिकण्ठ, ८ खण्डपरशु. ९ प्रमथाधिप, १० गंगाधर, ११ महेश्वर, १२ रुद्रा, १३ विष्णू, १४ पितामह, १५ संसारवैद्य, १६ सर्वज्ञ, १७ परमात्मा व १८ कपाली. ( कल्याण शिवांक )

**अठरा न्याय**

१ हंसक्षीर न्याय, २ उदंडापूप न्याय, ३ बीजांकुर न्याय, ४ लोहचुंबक न्याय, ५ वह्निधूम न्याय, ६ स्थालिपुलक न्याय, ७ स्वाभिमृत्य न्याय, ८ रविघूक न्याय, ९ कूपमंडूक न्याय, १० सिंहावलोकन न्याय, ११ अरुंधतिदर्शन न्याय, १२ अंथचटक न्याय, १३ सूर्यजयद्रथ न्याय, १४ काकदंतगवेषण न्याय , १५ पंकप्रक्षालन न्याय , १६ पिष्टपेषण न्याय, १७ काकाक्षिगोलक, न्याय, व १८ घुणाश्वर न्याय, असे अठरा न्याय, तर्कशास्त्रात सांगितले आहेत . न्याय-म्हणजे निर्दोष विचारचर्चा, अनुमाने यांना अवश्य असे नियम

# शक्ती, बुद्धी आणि चातुर्याचा संगम म्हणजे हनुमानजी

## श्रीराम आणि श्रीकृष्ण अवतारात महत्त्वाची भूमिका

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हनुमानजींसारखा भक्त आजपर्यंत कोणीही झालेला नाही. पद्मपुराणामध्ये हनुमानजींच्या अफाट बुद्धिमत्तेचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्याच्यासारखा बुद्धिमान देखील दुसरा कोणीही नाही. शक्ती, बुद्धी आणि चातुर्य याचा संगम म्हणजेच श्रीराम भक्त हनुमानजी. म्हणूनच हनुमानजींचे दर्शन घेताना श्रीरामांच्या नावाचा उल्लेख केला तर ही बाब हनुमानजींना अतिशय आवडते, असे म्हटले जाते. श्रीराम हे नाव हनुमानजींना अत्यंत प्रिय आहे किंवा या नावाच्या पलीकडे त्यांचे दुसरे कोणतेही विश्व नाही. म्हणूनच श्रीराम अवतार असो वा श्रीकृष्ण अवतार असो या दोन्हीही अवतारांमध्ये अत्यंत महत्त्वाच्या क्षणी हनुमानजींकडे जबाबदारी देण्यात आली होती.



या दोन्ही अवतारांमध्ये ज्या-ज्या वेळी एखाद्या अहंकार झालेल्या व्यक्तीचा गर्वहरण करायचा असेल तर ही जबाबदारी देखील परमेश्वराने हनुमानजींकडे दिली होती. हनुमानजींनी देखील ही जबाबदारी तितक्याच श्रद्धेने पार पाडली होती. जबाबदारी पार पाडल्यानंतर हनुमानजींनी त्याचे श्रेय स्वतःकडे कधी घेतले नाही. उलटपक्षी परमेश्वराच्या असीम कृपेमुळेच आपण हे कार्य करू शकलो, हीच भावना त्यांनी कायम ठेवली.

हनुमानजींच्या नुसत्या दर्शनाचे खूप मोठे फळ आहे. म्हणूनच कितीही मोठे संकट आले तरी शास्त्राचे जाणकार हनुमानजींचे दर्शन घेण्याबरोबरच इतर हनुमानजींच्या संदर्भात उपाय सांगतात. आणि भक्तीने, भक्ती-भावाने आणि मनापासून शरण गेल्यास संकट दूर होते, असा बहुतेकांचा अनुभव असतो आणि आहे. अशा या श्रीराम भक्त हनुमानजींची कृपा सर्वांवर राहावी आणि आपल्या देशात शांतता राहावी, देशाची प्रगती व्हावी, हीच या हनुमानजींच्या जयंतीनिमित्त प्रार्थना आहे.

# पौर्णिमेचे ताट वाढताना कोणत्या शास्त्राधारित पद्धती पाळतात?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

चैत्र पौर्णिमा किंवा कोणत्याही पौर्णिमेला देवीची पूजा करताना पौर्णिमेचे किंवा नैवेद्याचे ताट वाढताना काही शास्त्राधारित पद्धती पाळल्या जातात. भोजनाच्या ताटात पदार्थांची मांडणी ही 'डावी' आणि 'उजवी' बाजू लक्षात घेऊन केली जाते. नैवेद्याचे ताट तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे मांडणी करतात.

**१) ताटाची मांडणी (डावी आणि उजवी बाजू)**

**मीठ :** ताटाच्या वरच्या बाजूला मध्यभागी थोडे मीठ वाढावे.

**डावी बाजू (तुमच्या डाव्या हाताला) :** येथे लिंबू, चटणी, कोशिंबीर, लोणचे आणि पापड किंवा भजी यांसारखे तोंडी लावणीचे पदार्थ वाढावेत.

**उजवी बाजू (तुमच्या उजव्या हाताला) :** येथे पालेभाजी, कोरडी भाजी आणि रस्सा भाजी वाढावी.

**२) मुख्य पदार्थ (मध्यभागी)**

**वरण-भात :** ताटाच्या मध्यभागी खालच्या बाजूला भात वाढून त्यावर वरण आणि साजूक तुपाची धार असावी.

**पुरणपोळी किंवा खीर :** पौर्णिमेला विशेषतः पुरणपोळीचा किंवा तांदळाच्या खिरीचा नैवेद्य दाखविण्याची प्रथा आहे. पुरणपोळी असल्यास ती भाताच्या उजव्या बाजूला ठेवावी.

**३) नैवेद्याचे पदार्थ (विशेषतः पौर्णिमेसाठी)**

पौर्णिमेला 'चंद्र' आणि 'लक्ष्मी' तत्त्वाची उपासना केली जाते, म्हणून पांढऱ्या रंगाच्या पदार्थांना महत्त्व असते.

**खीर :** तांदळाची किंवा शेवयांची दूध घालून केलेली खीर.

**कटाची आमटी :** जर पुरणपोळी केली असेल, तर त्यासोबत कटाची आमटी असावी.

**सात्त्विक भोजन :** नैवेद्याच्या ताटात शक्यतो कांदा आणि लसूण यांचा वापर टाळावा.

**४) पूजेचा विधी (ताट अर्पण करताना)**

ताटाभोवती पाण्याचा मंडल (गोल) फिरवावा. नैवेद्यावर तुळशीचे पान ठेवावे. '**प्राणाय स्वाहा, अपानाय स्वाहा, व्यानाय स्वाहा, उदानाय स्वाहा, समानाय स्वाहा, ब्रह्मणे स्वाहा**' हा मंत्र म्हणत देवाला नैवेद्य अर्पण करावा. पौर्णिमेवेळी ताटात बुंदीचे लाडू किंवा सोप्या पद्धतीचा शिरा (प्रसाद म्हणून) समाविष्ट करणे शुभ मानले जाते.

# महिलांनी मारुती मंदिरात जावे का नाही?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जर आपली देवावर श्रद्धा असेल, तर अगदी जरूर जावे. त्या हनुमंतजींनी माता सीतेची एवढी मदत केली तेव्हा त्यांना त्यांच्या दर्शनाला महिलांनी गर्दी केली तर काही हरकत असेल का? हे सगळे मनुष्याने बनविलेले नियम आहेत. तेव्हा मनुष्य ते नियम बदलूही शकला पाहिजे.

नियम बनविण्यामागे काही शास्त्रीय कारण असू शकते. काही हिंदू मंदिरांत सुद्धा गाभाऱ्यात महिलांना प्रवेश निषिद्ध आहे. प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे शास्त्र आहे तसेच याबाबतही असू शकते. खात्री करून मगच निर्णय घ्यावा. महिलांनी मारुतींच्या मंदिरामध्ये जायला काहीच हरकत नाही. परंतु मारुतींना महिलांनी स्पर्श करू नये. कारण मारुतीराया ब्रह्मचारी होते. परंतु मारुतीराया हे विवाहित होते.

**जय श्रीराम। जय श्री हनुमान॥**

# वास्तु पुरुष का रहस्य : जानिए क्यों हर घर में है यह अदृश्य शक्ति

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

नमस्ते दोस्तों,
आज मैं आपको वास्तु पुरुष के बारे में बताने जा रहा हूँ। यह कोई साधारण विषय नहीं है। यह वह अदृश्य शक्ति है जो हर घर, हर भवन, हर निर्माण में निवास करती है। जो इसे समझता है, उसका घर सुख-शांति से भर जाता है। जो अनदेखी करता है, उसे कदम-कदम पर बाधाएँ घेर लेती हैं।

## वास्तु पुरुष कौन हैं?

वास्तु पुरुष भवन के प्रमुख देवता हैं। यह वह शक्ति है जो हर निर्माण में विद्यमान रहती है। शास्त्रों में इनका स्वरूप इस प्रकार बताया गया है

**'ईशाने शिर उद्दिष्टं नैर्ऋत्यां पादयोः स्थितिः। आग्नेये वायवे चैव करपादसमन्वितः॥'**

अर्थात : वास्तु पुरुष का मस्तक ईशान कोण (उत्तर-पूर्व) में और पैर नैर्ऋत्य कोण (दक्षिण-पश्चिम) में होते हैं। हाथ और पैर की संधियाँ आग्नेय (दक्षिण-पूर्व) और वायव्य (उत्तर-पश्चिम) कोण में होती हैं। यानी पूरा भवन ही वास्तु पुरुष का शरीर है। हर कोना, हर दिशा उनके शरीर का कोई न कोई अंग है।

## वास्तु पुरुष की उत्पत्ति की कथा

प्राचीन काल में अंधकासुर नामक एक अत्यंत शक्तिशाली दैत्य था। उसने भगवान शंकर से युद्ध किया। यह युद्ध इतना भीषण था कि शंकर जी के शरीर से पसीने की बूँदें जमीन पर गिर पड़ीं। उन बूँदों से एक अत्यंत भयंकर प्राणी प्रकट हुआ। उसका स्वरूप इतना विकराल था कि आकाश और पृथ्वी दोनों काँप उठे। वह प्राणी तुरंत देवताओं पर टूट पड़ा और उन्हें मारने लगा। सभी देवता घबरा गए। उन्होंने मिलकर उस प्राणी को पकड़ लिया और उसका मुँह नीचे की ओर करके जमीन पर दबा दिया। तब देवताओं ने उसे शांत करने के लिए वरदान दिया।

**'सर्वेषां मंगलानां त्वं पूज्यः स्थास्यसि सर्वदा। गृहारम्भे च संप्राप्ते पूजयिष्यन्ति मानवाः॥'**

अर्थात : तुम सभी शुभ कार्यों में सदा पूजित होगे। जब भी गृहारंभ होगा, मनुष्य तुम्हारी पूजा करेंगे। देवताओं ने उस पुरुष पर वास किया, इसलिए उसका नाम वास्तु पुरुष पड़ा। आज भी वह उसी भवन के भीतर औंधे मुँह लेटा हुआ है, और सभी देवता उस पर आसीन हैं।

## क्यों जरूरी है वास्तु पुरुष की पूजा?

शास्त्र स्पष्ट कहता है,

**'यो न पूजयते विद्वान् वास्तु देवं गृहे स्थितम्। प्रतिपद्यति स क्लेशान् अकाले च मृतिं व्रजेत्॥'**

अर्थात : जो विद्वान पुरुष अपने घर में स्थित




वास्तु देव की पूजा नहीं करता, उसे कदम-कदम पर क्लेश उठाने पड़ सकते हैं। इसलिए हर निर्माण से पहले, हर गृह प्रवेश से पहले, वास्तु पुरुष की पूजा अनिवार्य है।

## कब करें वास्तु पुरुष की पूजा?

वास्तु पुरुष की पूजा निम्नलिखित अवसरों पर अवश्य करनी चाहिए। गृह निर्माण के प्रारंभ में जब भूमि पूजन किया जाता है। द्वार बनाने के समय मुख्य द्वार की स्थापना से पहले । गृह प्रवेश के समय नए घर में रहने से पहले।

इसके अतिरिक्त, ये अवसर भी हैं ।
यज्ञोपवीत, विवाह आदि संस्कारों के समय। जीर्णोद्धार (पुराने घर की मरम्मत) के बाद। बिजली या अग्नि से जले मकान को पुनः बनाने के बाद। जहाँ स्त्रियाँ लड़ती-झगड़ती हों, वहाँ जहाँ घर में रोगी हों, वहाँ किसी भी उत्पात से दूषित घर में पुनः प्रवेश करते समय। पुत्र जन्म के समय
किसी भी यज्ञ के प्रारंभ में।

**'गृहारम्भे तथा द्वारे प्रवेशे च विशेषतः। वास्तुपूजां प्रकुर्वीत सर्वकामार्थसिद्धये॥'**

विधिवत पूजा करने पर घर के सभी दोष समाप्त हो जाते हैं। सुख, शांति और कल्याण की प्राप्ति होती है।

## वास्तु पीठ कितने प्रकार के होते हैं?

कर्मकांड में वास्तु पुरुष की पूजा के लिए अलग-अलग प्रकार के वास्तु पीठों का विधान है। जितनी जमीन पर घर बनाना हो, उतनी जमीन से वास्तु पुरुष की कल्पना की जाती है।

**वास्तु राजवल्लभ ग्रंथ में कहा गया है ।**

**'ग्रामे भूपति मन्दिरे च नगरे पूज्यः चतुःषष्टिके। एकाशीतिपदैः समस्त भवने जीर्णे नवे वा पुनः॥ प्रासादे तु शतांशकैः सकले पूज्यस्तथा मण्डपे। कूपेष्वपि चतुःशतैः सरसि वाप्यां षडुत्तरैः शतैः॥'**

अर्थात : गाँव बसाते समय और नगर या राजमहल बनाते समय ६४ पद वास्तु की पूजा करनी चाहिए। वास स्थान घर के लिए ८१ पद, जीर्णोद्धार के लिए ४९ पद, सर्व प्रकार के प्रासाद एवं मंडपों के लिए १०० पद तथा कुआं, तालाब एवं जलाशय के लिए १४४ या १९४ पद वाले वास्तु पीठ का पूजन करना चाहिए।

निर्माण का प्रकार पद संख्या
गाँव, नगर, राजमहल ६४ पद
सामान्य घर (वास स्थान) ८१ पद
जीर्णोद्धार ४९ पद
प्रासाद, मंडप १०० पद
कुआँ, तालाब, जलाशय १४४ या १९४ पद

और इससे भी बड़े निर्माणों के लिए

**'दुर्गा प्रतिष्ठा विषये निवेशे तथा महार्चासु च कोटिहोमे। मेरौ च राष्ट्रेष्वपि सिद्धलिंगे वास्तु सहस्रेण पदे प्रपूज्यः॥'**

अर्थात : दुर्गा की प्रतिष्ठा, नगर निर्माण, यज्ञ, देशनिर्माण, राजधानी एवं सिद्ध शिवलिंग की प्रतिष्ठा के समय 1000 तालिका वाले वास्तु पीठ का पूजन करना चाहिए।

## निर्माण का प्रकार पद संख्या

दुर्गा प्रतिष्ठा, नगर निर्माण, यज्ञ, देश निर्माण, राजधानी, सिद्ध शिवलिंग की प्रतिष्ठा १००० पद।

## ब्रह्म स्थान सबसे महत्वपूर्ण भाग

किसी भी भूखंड का केंद्र ब्रह्म स्थान कहलाता है। यह वास्तु पुरुष की नाभि के आसपास का क्षेत्र है  पेट, गुप्तांग और जांघों का स्थान। यही वास्तु पुरुष के फेफड़े और हृदय का भी स्थान है।

**'वास्तोर्मध्ये तु नाभिः स्याद्ब्रह्मस्थानं प्रकीर्तितम्। तद्धि सर्वात्मकं स्थानं सर्वदेवमयं शुभम्॥'**

अर्थात : वास्तु के मध्य में नाभि होती है, जो ब्रह्म स्थान कहलाती है। यह स्थान सभी देवताओं से युक्त, सर्वात्मक और अत्यंत शुभ है। यह स्थान ऊर्जा का केंद्र बिंदु माना गया है।

ब्रह्म स्थान को हमेशा खुला और भार रहित रखना चाहिए।

**'ब्रह्मस्थानं सदा रक्ष्यं न कर्तव्यं तु निर्मितिम्। सुखसम्पत्तिवृद्ध्यर्थं शान्त्यर्थं गृहमेधिनाम्॥'**

अर्थात : गृहस्थों के सुख, सम्पत्ति और शांति के लिए ब्रह्म स्थान की सदा रक्षा करनी चाहिए, वहाँ कभी कोई निर्माण नहीं करना चाहिए।

यदि घर में रहने वाले लोग सुख, समृद्धि, स्वास्थ्य और खुशहाली चाहते हैं, तो ब्रह्म स्थान पर किसी भी प्रकार का निर्माण कार्य नहीं करना चाहिए। न कोई दीवार, न कोई खंभा, न कोई भारी सामान।

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**